जा.क्र. 3325/15.

धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई ४०० ०१८

धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

20 JUN 2015

**कार्यालयीन परिपत्रक क्र.** ४30 दि. १८/०६/१५.

कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे कि, मुख्यालयात व धर्मादाय सह आयुक्त कार्यालयात कलम ४१ ड , ३६ (१)(अ), ७०, ७० अ, ४१ ई , ४७, ३६ (२), ५० (ए)(२), नियम ३६ (१)(२)(३)(४). व इतर अर्ज दाखल होत असतात. सदर अर्जांची छाननी करत असताना असे निदर्शनास येते कि, ब-याच वेळा न्यासांचे बदल अर्ज व इतर न्यायीक स्वरुपाचे अर्ज धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कडे प्रलंबित असतात अशा वेळी सदरच्या प्रकरणांमध्ये न्यायनिवाडा करण्यास मोठया प्रमाणावर विलंब होत असल्याचे दिसुन येते.

तरी अशा प्रसंगी कार्यालयीन कामकाज सुरळीत चालावे व वरीलप्रकारच्या न्यायीक अडचणींचा पक्षकारांना विनाकारण त्रास सोसावा लागू नये याकरिता सर्व धर्मादाय सह आयुक्त यांनी अशावेळी संबंधित धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांना त्याप्रकरणाशी संबंधित प्रकरणे सत्वर गतीने निकाली काढणेकरिता निर्देशित करण्यात यावे.

धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य मुंबई